Chairman
**Vidyadhar Anaskar**
M.Com., D.T.L., D.L.L. & L.W., LL.B.

Vice Chairman
**Ramakant Khetan**
B.Sc., LL.B.

Chief Executive & Secretary
**Sayali Bhoir**
B.Com., G.D.C. & A., LL.B., C.A.I.I.B
MBA (Banking & Finance)

**The Maharashtra Urban Co-op. Banks' Federation Ltd.**

(Regd. No. BOM-GNL-8 of 9th March 1979)

Bharatiya Krida Mandir, 4th Floor,
Wadala, Mumbai - 400 031. P. B. No. 7120,
Tel. : 022 - 2413 5797, Fax : 022 - 2415 1185
E-mail : admin@mucbf.com ● www.mucbf.com

परिपत्रक: एमयुसीबीएफ/ ३९/ १२/ २०१७-१८
दिनांक: २३ फेब्रुवारी,२०१८

**प्रति,**
**मा.अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी**
सर्व प्राथमिक नागरी सहकारी बँका

**विषय:** नागरी सहकारी बँकांना लागू करण्यात आलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजना - २०१७
**सदंर्भ:** शासन निर्णय क्रमांक - युआरबी-१८०७/प्र.क्र.४५९(ब)/७-स, दि.१५/११/२०१७

**महोदय,**

वरील विषयानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने शासन निर्णय क्रमांक:युआरबी-१८०७/प्र.क्र.४५९(ब)/७-स, दि.१५ नोव्हेंबर,२०१७ रोजीच्या आदेशानुसार राज्यातील सर्व नागरी सहकारी बँकांना एकरकमी कर्ज परतफेड योजना लागू करण्याबाबतचे परिपत्रक पाठविले होते. सदर योजनेतील काही मुद्यांवर खुलासा अपेक्षित असल्याचे फेडरेशनच्या अनेक सभासद बँकांनी फेडरेशनला कळविले होते. या कारणास्तव संबंधित परिपत्रकात आवश्यक तो खुलासा करणेसंदर्भात फेडरेशनने मा.सहकार आयुक्त कार्यालयास पत्रव्यवहार देखील केला होता. तसेच दि.२० फेब्रुवारी,२०१८ रोजी पुणे येथे मा.सहकार आयुक्त कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून फेडरेशनच्या शिष्टमंडळाने एकरकमी कर्ज परतफेड योजना-२०१७ संदर्भात कराव्या लागणाऱ्या खुलाशांचा मसुदा मा.सहकार आयुक्तांना सादर केला होता.

त्याअनुषंगाने मा.सहकार आयुक्त, सहकारी संस्था, पुणे यांनी त्यांचे जावक क्र.ना.बँका/ १-सआ/ओटीएस/ २०१७/ २०१८ /३४५ दि.२१/२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये 'नागरी सहकारी बँकांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना-२०१७' संदर्भात कराव्या लागणाऱ्या प्रस्तावित खुलाशांबाबतचे शुद्धीपत्रक मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना शिफारसीसह मंजुरीसाठी पाठविले आहे. सदर शुध्दीपत्रक अद्यापही मा.अपर मुख्य सचिव (सहकार) यांचे मंजुरीसाठी प्रलंबीत आहे. सदर शिफारसींची प्रत मा.सहकार आयुक्त यांनी फेडरेशनचे मा.अध्यक्ष यांच्या नावाने पाठविली आहे. दरम्यान अनेक नागरी सहकारी बँकांच्या विनंतीवरुन सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या पूर्वतयारीकरिता सदर पत्राची छायांकित प्रत आपल्या माहितीसाठी यासोबत पाठवित आहोत.

तरी कृपया नागरी सहकारी बँकांनी आपल्या स्तरावर यासंदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा ही विनंती.
कळावे.
आपली विश्वासू

**सौ. सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव

सोबत: वरीलप्रमाणे.